ARTHA (Commercial Weekly) Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १२ ऑगस्ट, १९५९ | अंक ३२

## विविध माहिती

**नागपूर येथें दंतवैद्यकाचें कॉलेज**—नागपूर येथें दंतवैद्यकाचें संपूर्ण शिक्षण देणारें कॉलेज लवकरच स्थापन करण्यांत येणार आहे. त्याशिवाय महारोगाचा प्रतिकार करण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांना शिक्षण देण्याचें एक केंद्रहि खोलण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या दोन्ही उपक्रमांबद्दल सरकार विचार करीत होतें. बहुधा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पार पडावयाच्या आधीं दोन्ही योजना सुरू करण्यांत येतील.

**भारत-चीन व्यापार**—गेल्या वर्षी भारत व चीन ह्यांच्या दरम्यान झालेल्या व्यापारांत भारताला प्रतिकूल तफावत सोसावी लागली. भारताच्या चीनकडील आयातींत वाढ झाली. आयात ४,८६,००,००० रुपयांवरून ५,२८,००,००० रुपयांपर्यंत वाढली व निर्यात ३,७०,००,००० रुपये किंमतीच्या मालावरून ३,४२,००,००० रुपये किंमतीच्या मालापर्यंत घसरली.

**टागोरांच्या 'गीतांजली' चीं भाषांतरें**—१९६१ च्या मे महिन्यांत रवींद्रनाथ टागोरांची १०० वी जयंति साजरी करण्यांत येणार आहे. त्यानिमित्त त्यांच्या 'गीतांजली' ह्या ग्रंथाची काश्मिरी व डोग्री भाषांत भाषांतरें करण्यांत येणार आहेत. त्याशिवाय त्यांच्या एका नाटकाचें काश्मिरी भाषेंत रूपांतर करण्यांत येऊन त्याचा प्रयोगहि करण्यांत येणार आहे.

**मद्रास येथील तंत्रविज्ञानाची संस्था**—भारतांत उच्च तंत्रविज्ञानाच्या ज्या चार संस्था भारत सरकार स्थापन करणार आहे त्यांपैकी तिसऱ्या संस्थेचें उद्घाटन मद्रास येथें करण्यांत आलें. ही संस्था पश्चिम जर्मनीच्या साह्यानें उभारण्यांत येत असून गिंडी येथें ६०० एकर जागेवर ती वसविण्यांत आली आहे. संस्थेंत पदवी घेणाऱ्या १,५०० विद्यार्थ्यांची व डिप्लोमा घेणाऱ्या ५०० विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.

**दिल्लीमध्यें जनता होटेल**—१९६१ च्या दुसऱ्या सहामाहीपर्यंत दिल्लीमध्यें सरकारी मालकीचें जनता हॉटेल स्थापन करण्यांत येणार आहे. ह्या हॉटेलमध्यें ४०० खोल्यांची सोय करण्यांत येईल. दिल्ली येथील सुप्रसिद्ध अशोक हॉटेल मध्यम वर्गातील लोकांना परवडण्यासारखें नसल्यामुळें त्यांच्या सोयीसाठी जनता हॉटेलचा उपक्रम हातीं घेण्यांत येत आहे.

**सिंगापूरमधील सावकारीवर नियंत्रण**—सिंगापूर येथें सावकारीचा धंदा करणाऱ्या लोकांवर कडक नियंत्रण बसविण्याचें सरकारनें ठरविलें आहे. नियंत्रण-तारणावरील व बिगरतारणावरील अशा दोन्ही व्यवहारांना लागूं होईल. सिंगापूर येथें १,००० शीख सावकार व ३०० चेट्टिआर सावकार असून ते ऋणकोंकडून भरमसाट व्याज घेतात, अशी सरकारची माहिती आहे.

**दिल्ली कॉर्पोरेशनला कर्ज पाहिजे**—दिल्ली कॉर्पोरेशननें आपलीं कांहीं मोठीं कामें पार पाडण्यासाठी भारत सरकारकडे २ कोटी रुपयांचें कर्ज मागण्याचें ठरविलें आहे. सरकारनें जर सर्व रकमेचें कर्ज मंजूर केलें नाहीं तर बाकीची रक्कम कॉर्पोरेशन डिबेंचर्स काढून उभारण्याचा विचार करीत आहे. डिबेंचर्सवरील व्याजाचा दर व त्याची मुदत सरकारच्या संमतीनें ठरविण्यांत येईल.

**अध्यक्ष आयसेन होअर ह्यांचा कार्यक्रम**—अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन होअर १९६१ च्या जानेवारींत आपल्या पदावरून निवृत्त झाल्यावर बऱ्याच परदेशांना भेटी देण्याचा संभव आहे. कितीतरी देशांच्या सरकारांकडून त्यांना आमंत्रणें आलीं आहेत. विशेषतः दक्षिण अमेरिका, आफ्रिका आणि अतिपूर्वेकडील देश ह्या भागांत प्रवास करण्याचा त्यांचा विचार आहे. हिंदी महासागराच्या भागांतहि ते येण्याची शक्यता आहे.

**नागपूरजवळ कोळशाच्या खाणी**—नागपूरजवळ कामटीच्या आसपास भारत सरकारचें भूगर्भखातें संशोधन करीत होतें. संशोधनाचा निष्कर्ष म्हणून असें सांगण्यांत येत आहे कीं कामटी व सावनेर दरम्यानच्या २५ चौरस मैलांच्या भागांत उत्तम प्रतीच्या कोळशाच्या खाणी मोठ्या प्रमाणावर सांपडतील. सुमारें १०० कोटी टन कोळसा मिळूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**टेलिफोनच्या निर्यातीची शक्यता**—सयामच्या सरकारचें एंजिनिअरांचें एक प्रतिनिधिमंडळ भारताच्या दौऱ्यावर आहे. त्यानें बंगलोर येथील टेलिफोनच्या कारखान्याला भेट दिली. हिंदच्या औद्योगिक प्रगतीबद्दल त्यानें समाधान व्यक्त केलें. बंगलोरच्या कारखान्यांत होणाऱ्या टेलिफोनसाठी सयामच्या सरकारकडून मागणी येण्याची शक्यता आहे.

**जगाच्या नाशाला ४,००० अणुबाँब्स**—हिरोशिमा ह्या शहरांत, अणुचलित शस्त्रास्त्रांना विरोध करण्यासाठी ५ वी जागतिक परिषद भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेंत अमेरिकन शास्त्रज्ञ डॉ. पॉलिंग ह्यांनीं अशी माहिती दिली कीं, जगाचा संपूर्ण नाश होण्यासाठी फक्त ४,००० अणुबाँब्स पुरतील. १० लक्ष टन सामान्य स्फोटक द्रव्याबरोबर एक अणुबाँब, असा हिशेब आहे.

**केरळ सरकारचें कर्ज**—केरळमधील पदभ्रष्ट नंबुद्रीपाद सरकारनें राज्यासाठी काढावयाचें सार्वजनिक कर्ज लांबणीवर टाकलें होतें. आतां राष्ट्राध्यक्षांचा अंमल सुरू झाल्यावर ४ कोटी रुपयांचें कर्ज काढण्यांत येणार आहे. राज्यांतील बँका व उद्योगपती ह्यांच्याकडून कर्जाला चांगला पाठिंबा मिळण्याचा संभव आहे.

**कऱ्हाड शहराला भुयारी गटारें**—कऱ्हाड म्युनिसिपालिटी शहरासाठी सांडपाण्याचीं भुयारी गटारें बांधण्याच्या योजनेचा विचार करीत आहे. ह्या कामासाठी २४,६२,५०० रुपये लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे. पुढील जून महिन्यांत कऱ्हाडची पाणीपुरवठा-योजना पूर्ण करण्यांत येईल व नंतर भुयारी गटारांची योजना हातीं घेण्यांत येईल.

**नर्मदा खोरें-योजना**—नर्मदा नदीच्या खोऱ्याचा विकास करण्याची योजना मुंबई राज्य सरकारनें हातीं घ्यावी अशी मागणी करण्यांत आली आहे. ही योजना अंमलांत आणली गेल्यास भडोच व बडोदा जिल्ह्यांतील १२ लाख एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊन मुंबई राज्यांतील अन्नधान्याची टंचाई ३ लाख टनांनीं कमी होईल, असें योजनेच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे.

**अंदमान बेटांची पहाणी**—अंदमान व निकोबार बेटांची तांत्रिक आर्थिक पहाणी पुढच्या वर्षाच्या प्रारंभीं करण्यांत येणार आहे. नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ही संस्था पहाणी करणार आहे. ह्या बेटांची आर्थिक उन्नति घडवून आणण्यासाठी काय करतां येईल हें अजमावण्याचा पहाणीचा हेतु आहे.

**१० हजार मण साखर जप्त**—कलकत्त्याहून आसामला धाडण्यासाठीं बेकायदा जमविलेली १० हजार मण साखर पोलिसांनीं आपल्या ताब्यांत घेतली आहे. पश्चिम बंगालमधून परवाना घेतल्याशिवाय साखर बाहेर पाठविण्याची बंदी मोडून ही साखर आसामला पाठविण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. साखरेची किंमत ८ लाख रुपये आहे.

**रशिआंत टागोर दिन**—वंग कवि रवींद्रनाथ टागोर ह्यांची १०० वी जयंति रशिआंत मोठ्या प्रमाणावर साजरी केली जाणार आहे. संवत्सरीचा प्रसंग साधून टागोरांच्या ग्रंथांची रशिअन भाषेंतील आवृत्ति प्रकाशित करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या एका नाटकावर आधारलेला नृत्यनाट्याचा प्रयोगहि रंगभूमीवर करून दाखविण्यांत येणार आहे.

**नागपूर भागांतील संत्र्यांचें नुकसान**—नागपूर भागांत गेल्या कांहीं महिन्यांत झालेल्या अकाली व जोरदार पर्जन्य-वृष्टीमुळें संत्र्यांचें पीक जवळ जवळ नाश पावलें आहे. ह्या वृष्टीमुळें नागपूरच्या संत्र्यांच्या बागांचें ३ कोटी रुपयेपर्यंत नुकसान झालें असावें. संत्रीं पिकविणाऱ्या जगांतील मोठ्या केंद्रांत नागपूरचा समावेश येतो.

**विजेवरील कर रद्द करा**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनच्या पंजाब शाखेनें राज्य सरकारकडे अशी मागणी केली आहे कीं, साखरेच्या कारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या विजेवरील कर रद्द करण्यांत यावा. ह्या करामुळें उत्तर प्रदेश व बिहारमधील साखर कारखान्यांच्या स्पर्धेला तोंड देतां येणें पंजाबमधील कारखान्यांना शक्य होणार नाहीं, असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

**पोलंडकडून एंजिनें आलीं**—भारत व पोलंड ह्यांच्यांतील कराराप्रमाणें भारतानें पोलंडकडे ३० रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविली होती. त्यांपैकीं शेवटचा ५ एंजिनांचा हप्ता मुंबई बंदरांत आला आहे. हीं एंजिनें आतां परळ येथील रेल्वेच्या कारखान्यांत जोडण्यांत येतील आणि नंतर वापरण्यासाठी धाडण्यांत येतील.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | $२\frac{१}{२}$ टक्के |
| २ वर्षें | : | $२\frac{३}{४}$ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | $३\frac{१}{२}$ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )
चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १२ ऑगस्ट, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रांची येथील ओतकामाचा कारखाना

बिहारमधील रांची येथें यंत्रें बनविण्यासाठीं लागणारा ओतकामाचा प्रचंड कारखाना काढण्यांत येणार आहे. कारखान्यासंबंधींचा प्राथमिक अहवाल अजून हातीं येण्यास पुष्कळ अवकाश असला तरी त्या दिशेनें तयारी चालू झाली आहे. हा कारखाना उभारण्याच्या कामीं चेकोस्लोव्हाकिआचें सहकार्य घेण्यांत येणार आहे. अहवालासंबंधीं चर्चा करण्यासाठी चेक-तज्ज्ञांचें एक मंडळ भारतांत येणार आहे. त आपल्याबरोबर १ टन वजनाचे नकाशे, तक्ते व तांत्रिक अहवाल विमानानेंच आणणार आहे. भारतामधील तज्ज्ञांबरोबर तपशीलवार चर्चा करण्यांत आल्यावर अहवाल तयार करण्यांत यावयाचा आहे. ओतकामाच्या ह्या प्रचंड कारखान्यासाठीं २८ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं सुमारें ४०० एंजिनिअरांना राबावें लागणार आहे. १९६२ च्या अखेरीस कारखान्याचा पहिला टप्पा पुरा होईल. मग कारखान्यांतून दरसाल २०,००० टन वजनाच्या यंत्रसामुग्रीला लागणारे साचे तयार होऊं लागतील. कारखान्याची उभारणी अशा रीतीनें करण्यांत येणार आहे, कीं विस्ताराचें काम कारखान्याला स्वतःच पार पाडतां यावें. दरसाल ८०,००० ते ८५,००० टन वजनाची यंत्रसामुग्री कारखान्याच्या ओतकामापासून तयार होऊं शकेल, इतका त्याचा विस्तार शक्य होईल. मात्र इतका विस्तार होण्यास १९६६ साल उजाडेल. चेकोस्लोव्हाकिआनें आपल्या कारखान्यांत १५० एंजिनिअर्सना व तंत्रज्ञांना शिक्षण देण्याचें कबूल केलें आहे. त्यांच्या शिक्षणाचा खर्च चेक सरकार करण्यास तयार आहे. त्यांचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा राहील. भारत सरकार त्यांच्या प्रवासाचा व इतर खर्च करणार आहे.

---

## दिल्लीमधील जनता–होटेलची उपयुक्तता

दिल्ली ही भारताची राजधानी असल्यामुळें त्या शहराला कामाधामासाठीं जाणाऱ्या व्यापाऱ्यांची, उद्योगपतींची व इतर लोकांची संख्या गेल्या कांहीं वर्षांत खूपच वाढली आहे. घरटंचाईचा प्रश्न देशांतील इतर मोठ्या शहरांप्रमाणें दिल्लींतहि तीव्र स्वरूपाचा आहे. त्यामुळें दिल्लीला जाणाऱ्या उद्योगी प्रवाशांची फार कुचंबणा होते. शहरांत नव्यानें बांधण्यांत आलेलें अशोक होटेल इतकें महाग आहे कीं, त्याचा उपयोग परदेशीय प्रवाशांना व अगदीं वरच्या वर्गांतील हिंदी लोकांनाच परवडण्यासारखा आहे. मध्यम वर्गांतील लोकांच्या ऐपतीला झेपेल असें होटेल दिल्लींत आज नाहीं. ही उणीव आतां भरून काढण्यांत येणार आहे. नवी दिल्ली व जुनी दिल्ली ह्यांच्या दरम्यान एखाद्या सोईस्कर मध्यवर्ती ठिकाणीं मध्यवर्ती सरकार जनता होटेल काढणार आहे. ह्या होटेलमध्यें सर्व प्रकारच्या आधुनिक सोयी ठेवण्यांत येणार असल्या तरी त्यामधील राहण्याचे व जेवणाचे दर वाजवी ठेवण्यांत येणार आहेत. होटेलमध्यें ४०० खोल्या बांधण्यांत येणार आहेत. ह्या त्यांचे राहण्याचे दर दररोज दोन रुपयांपासून सहा रुपयांपर्यंत असतील. होटेललाच जोडून एक चांगल्या प्रतीचें भोजनगृह चालू करण्यांत येईल. कांहीं खोल्या दोन माणसांना राहण्यासारख्या व कांहीं एकाच माणसाला राहण्यासारख्या असतील. कांहीं खोल्यांना वेगळें स्नानगृहहि असेल. होटेलमधील फर्निचर सामान्य प्रतीचें असेल. मोठमोठे गालिचे, सतरंज्या, इत्यादि हौशीच्या व शोभेच्या जिनसा त्यांत असणार नाहींत. ह्या वस्तूंमुळें खर्च निष्कारण वाढतो. अगदीं किमान सोयीसाठीं वाजवी दर देणाऱ्या सर्व लोकांना ह्या होटेलचा चांगलाच उपयोग होईल.

---

## डायरेक्टरांना काढून टाकण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार ?

बँकिंग कंपनीज (अमेंड्मेंट) बिलावरील जॉइंट कमिटीनें आपला अहवाल लोकसभेला सादर केला आहे. एखाद्या बँकेच्या चेअरमननें, डायरेक्टरानें किंवा प्रमुख अधिकाऱ्यानें कोणत्याहि कायद्याचा भंग केला असल्याचें ट्रायब्यूनला किंवा योग्य त्या अधिकाऱ्यांना आढळून आलें आणि अशा व्यक्तीचा बँकेशीं संबंध असणें अनिष्ट असल्याबद्दल रिझर्व्ह बँकेची खात्री झाली, तर रिझर्व्ह बँकेला त्या चेअरमनला, डायरेक्टराला वा प्रमुख अधिकाऱ्याला स्थानभ्रष्ट करण्याचा अधिकार असावा, असें जॉइंट कमिटीनें सुचविलें आहे. शेअर्स, डिबेंचर्स व बॉंड्स ह्यामधील बँकेच्या गुंतवणुकींतील घसाऱ्याची ऑडिटरच्या मताप्रमाणें पुरेशी तरतूद केलेली असेल तर हा घसारा प्रत्यक्ष लिहून न टाकतांहि बँकेला डिव्हिडंड जाहीर करण्याची परवानगी असावी, असेंहि जॉइंट कमिटीनें सुचविलें आहे.

---

## डिव्हिडंडसाठीं बँकांत स्वतंत्र खातें

कंपनी कायद्यांत दुरुस्ती करणाऱ्या बिलांत अशी एक तरतूद आहे, कीं प्रत्येक कंपनीनें डिव्हिडंड जाहीर केल्यावर १५ दिवसांच्या आंत डिव्हिडंडची पूर्ण रक्कम शेड्यूल्ड बँकेंत स्वतंत्र खात्यांत ठेवली पाहिजे. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनें सरकारकडे ह्याबद्दल आपली तक्रार नोंदविली आहे. डिव्हिडंडची रक्कम अशी ठेवल्यानें ती गोठल्यासारखीच होईल; इकडे कंपनीनें ओव्हरड्राफ्टवर किंवा कर्जावर व्याज द्यावयाचें आणि डिव्हिडंडची रक्कम बिनव्याजी किंवा अत्यल्प व्याजानें ठेवावयाची, हें नुकसानकारक आहे. कंपनीनें दिलेल्या डिव्हिडंडच्या वॉरंटची रक्कम भागीदारास बँकेनें दिली नाहीं, तर कंपनीवर जरूर इलाज करावा; पण डिव्हिडंडसाठीं स्वतंत्र रक्कम बाजूला काढायला लावणें कंपन्यांना सोईचें होणार नाहीं, असें फेडरेशनचें म्हणणें आहे.

---

## कंपनी कायद्याखालील दाव्यांसाठी सरकारी प्रासिक्यूटर्स

मुंबई, कलकत्ता, मद्रास व कानपूर येथें चार सरकारी प्रॉसिक्यूटर्सच्या जागा कंपनी कायद्याखालील दावे चालविण्यासाठीं भारत सरकारनें निर्माण केल्या आहेत.

## पश्चिम जर्मनीवर आर्थिक अरिष्टाची छाया

दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीची औद्योगिक घडी पार विस्कटून गेली होती. पण दीर्घोद्योगाच्या जोरावर तेथील लोकांनी व सरकारनें पुन्हा औद्योगिक भरभराट साधली. पश्चिम जर्मनीतील आर्थिक परिस्थिति युद्धोत्तर काळांत झपाट्यानें सुधारतच गेली. आतां मात्र पश्चिम जर्मनीच्या उद्योगधंद्यांवर औद्योगिक अरिष्टाची छाया पडल्यासारखें दिसत आहे. बाजारपेठेंतील बदललेल्या परिस्थितीला जर्मन उद्योगधंद्यांना तोंड द्यावें लागत आहे. त्यांतल्या त्यांत कापड, पोलाद आणि कोळसा ह्या धंद्यांच्या अडचणी तीव्र स्वरूपाच्या आहेत. कापडाचे बाजारभाव इतके घसरले आहेत कीं त्याची विक्री उत्पादनाच्या खर्चाच्याहि खालच्या पातळीवर नाइलाजानें होत आहे. जर्मन कापडाला फ्रेंच बनावटीच्या कापडाशीं स्पर्धा करावी लागत आहे आणि ह्या स्पर्धेत जर्मन कापडाची पिछेहाट होत आहे. सर्वांत अधिक फटका कोळशाच्या खाणींना बसला आहे. कोळशाच्या खाणींत फक्त ५ दिवसांचा कामाचा आठवडा चालू करण्यांत आला आहे. तरीसुद्धां कोळशाचें उत्पादन मागणीपेक्षा अधिकच होत आहे. एका जर्मन कंपनीनें आपल्या मालकीची एक खाण बंद करण्याचें ठरविलें असून ८०० कामगारांना कमी केले आहे. खाण-कामगारांच्या पुढाऱ्यांनीं केलेल्या अंदाजाप्रमाणें जर्मनींत आज ३ महिन्यांचें कोळशाचें उत्पादन शिल्लक आहे. कोळशाच्या खाणींतील संकटाचीं पावलें १८ महिन्यांपूर्वीच पडूं लागलीं होतीं. औद्योगिक शक्तीसाठी कोळसा न वापरतां त्याच्या ऐवजीं तेलाचें जळण वापरण्याची पद्धत वाढत आहे. त्यामुळें कोळशाची मागणी कमी होत आहे. गेल्या वर्षी २०,००० कोळसा कामगार कामावरून कमी करण्यांत आले. तेव्हांपासून कामगार कमी करण्याचें सत्र कमी-अधिक प्रमाणांत चालू आहेच. आतां आणखी २०,००० कामगार कमी करण्यांत आले आहेत.

---

## सेकंड व्हिक्टरी लोनची परतफेड

तीन टक्के दराच्या सेकंड व्हिक्टरी लोनमधील (१९५९–६०) उरलेलें कर्ज परत देण्याची तारीख १५ ऑगस्ट १९५९ असून या रकमेवर या तारखेनंतर व्याज मिळणार नाहीं. तथापि १५ ऑगस्ट १९५९ हा एक सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यानें या कर्जरोख्यांची रक्कम १४ ऑगस्ट १९५९ ला देण्यांत येईल. ठरलेल्या दिवशीं कर्जाची रक्कम देण्यास सोयीचें व्हावें म्हणून असे रोखे जवळ असणाऱ्यांनीं ते पब्लिक डेट ऑफिस, ट्रेझरी अगर स्टेट बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, बँक ऑफ म्हैसूर लि. यांच्या ज्या शाखांत व्याज मिळण्यासाठीं नोंदणी केली होती तेथें ६ ऑगस्ट रोजीं वा त्यानंतर सादर करावेत. ही रक्कम मिळण्याच्या पद्धतींचा संपूर्ण तपशील यांपैकी कोठल्याहि कचेरींत अर्ज केल्यानंतर मिळूं शकेल.

---

## आंब्यांचा पुरवठा आणि वापर

भारतांत प्रतिवर्षी १७७·९ दशलक्ष मण कलमी व इतर निरनिराळ्या जातींचे आंबे तयार होतात. एकूण पुरवठ्यापैकी १७·७ दशलक्ष मण आंबे वांया जातात, १·१ दशलक्ष मण आंबे निर्यात होतात आणि १५९ दशलक्ष मण आंब्यांचा देशांतच या ना त्या स्वरूपांत खाण्यांत उपयोग केला जातो व या १५९ दशलक्ष मणांपैकी ३६·१ दशलक्ष मण कैऱ्यांचा लोणचीं, चटण्या, मोरंबे इत्यादींकरितां वापर होतो.

## एक आणि अर्ध्या आण्याचीं पिवळीं नाणीं १ जानेवारी-पासून चलनांतून काढून घेतलीं जाणार

निकेल आणि ब्रास पासून बनविलेलीं पिवळ्या रंगाचीं एक आणि अर्ध्या आण्याचीं नाणीं ता. १ जानेवारी, १९६० पासून चलनांतून काढून घेण्याचें सरकारनें ठरविलें असून त्या तारखेपासून हीं नाणीं कायदेशीर चलन म्हणून समजण्यांत येणार नाहींत. तथापि ३० जून १९६० पर्यंत हीं नाणीं पुढील ठिकाणीं सरकारी देणें देण्याच्या बाबतींत किंवा बदली करून घेण्यासाठींहि स्वीकारण्यांत येतील. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सर्व कचेऱ्या, सरकारी देण्याघेण्याचा व्यवहार करणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या सर्व एजन्सी बँका, आणि सर्व सरकारी ट्रेझऱ्या व सब-ट्रेझऱ्या. याच कालावधींत, म्हणजे ३० जून १९६० पर्यंत हीं नाणीं सर्व रेल्वे कचेऱ्यांतून आणि पोस्ट कचेऱ्यांतून फक्त देणें देण्याच्या बाबतींत स्वीकारण्यांत येतील.

त्याचप्रमाणें यापुढें हुकूम निघेपर्यंत हीं नाणीं, ३० जून १९६० नंतरहि रिझर्व्ह बँकेच्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, नवी दिल्ली, बंगलोर आणि नागपूर येथील इश्यु डिपार्टमेंटच्या कचेऱ्यांतून स्वीकारण्यांत येतील.

अशा रीतीनें या बाबतींत कोणत्याहि प्रकारें घाबरून जाण्याची जरूरी नसून लोकांनीं आपल्या जवळच्या निकेल-ब्रासच्या बनावटीच्या ह्या पिवळ्या नाण्यांची शक्यतों लौकर, मात्र उशिरांत उशीरा १९५९ चे कॅलेंडर वर्ष संपण्यापूर्वी, विल्हेवाट लावावी. त्यानंतरहि हीं नाणीं बदलून घेण्याची सोय आहे. मात्र ती कांहीं ठराविक कचेऱ्यांत आणि वर सांगितलेल्या पद्धतीनेंच होऊं शकेल. करड्या रंगाच्या कॉपर निकेलच्या बनावटीची एक व अर्ध्या आण्याचीं नाणीं चालूं राहतील.

---

## स्वयंचलित माग

आतांपर्यंत ८४ गिरण्यांना मिळून ६,६२५ स्वयंचलित माग ठेवण्यास मंजुरी देण्यांत आल्याचें मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्याचे मंत्री, श्री. लालबहादूर शास्त्री यांनीं सांगितलें. कापड निर्यातीसाठी ३,००० स्वयंचलित माग बसविण्याच्या योजनेखाली यावयाच्या मागांसंबंधीं यथावकाशांत विचार करण्यांत येईल असेंहि ते पुढें म्हणाले. कोणत्या प्रकारच्या स्वयंचलित मागांची आयात करावी हें अद्याप ठरविलें नसल्याचें श्री. शास्त्री यांनीं सांगितलें. भारतांत स्वयंचलित मागांचें उत्पादन करण्याचीहि योजना पुढें आली असल्याचें त्यांनीं सांगितलें.

---

## केरळ सरकार कर्ज उभारणार

बारा इतर राज्यांनीं नवीं कर्जे उभारावयाचीं ठरविलीं, तेव्हां त्यांच्यांत केरळचें कम्युनिस्ट सरकार सामील झालें नाहीं. केरळ बँकर्स असोसिएशन, त्रावणकोर-कोचीन बँकर्स असोसिएशन आणि इतर प्रमुख गिऱ्हाइकें ह्यांनीं कम्युनिस्ट केरळ सरकारला कर्ज उभारणीस मदत न करण्याचें ठरविलें होतें, त्याचा तो परिणाम होता. केरळमधील नवी राजवट लवकरच चार कोटी रुपयांच्या कर्जासाठी बाजारांत येईल, अशी अपेक्षा होती. बँकर्स व उद्योगपती ह्यांचेशीं नव्या सरकारचीं अनौपचारिक बोलणीं सुरुहि झालीं आणि अखेर केरळ सरकारनें चार कोटि रुपयांचें कर्ज जाहीर केलें आहे.

---

## जागा भरण्याचें तंत्र

### उमेदवारांच्या निवडीच्या योजनेचे आठ टप्पे

लेखक:—श्री. श्री. वा. काळे,

जाहिरात देऊन अर्ज मागविणें, अर्जदारांच्या मुलाखती घेणें, अर्जदारांची निवड करणें, नव्या नोकरांना कामाचें शिक्षण देणें, ह्या सर्व खर्चाच्याच बाबी आहेत. नेमणूक करतांना निवड चुकीची झाली कीं सर्व खर्च वाया जातो. कामाला अयोग्य असा माणूस कामावर ठेवल्यानें होणारा खर्च जरी दिसून आला नाहीं तरी तो मोठा असतो. ठेवण्याइतपत लायक नाहीं आणि काढण्याइतपत नालायक नाहीं अशांच्या पगारावर झालेला खर्च वायाच जातो. यावरून अर्जदारांतून योग्य निवड करण्याचें महत्त्व सहज ध्यानांत येण्यासारखें आहे.

हें टाळण्याकरितां अर्जदार काय करूं शकेल आणि तो प्रत्यक्ष काय करील ह्या दोन गोष्टींवर प्रामुख्यानें विचार करावयाला हवा. तो काय करूं शकेल हें अजमावणें अवघड नसतें. बुद्धिमत्ता, शिक्षण, वय, आरोग्य, ह्यांवरून तें समजूं शकतें. परंतु तेवढ्याच निकषांवरून निवडलेला अर्जदार देखील अपात्र ठरण्याचा संभव राहतो. कारण, तो प्रत्यक्ष काय करील ह्या प्रश्नाचें उत्तर मिळालेलें नसतें. ह्या प्रश्नाचें उत्तर मिळविण्याची एक तंत्रवजा योजना अमेरिकेंतील मॅकमरे कंपनीचे (मॅनेजमेंट कन्सल्टंट्स) प्रमुख डॉ. मॅकमरे ह्यांनीं तयार केली आहे नोकरवर्गाची निवड कशी करावी याचा त्यांनीं विशेष अभ्यास केलेला आहे. लंडन येथें त्यांनीं ह्यासंबंधीं भरविलेल्या बैठकींना ग्रेटब्रिटनमधील प्रमुख औद्योगिक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ह्यावरून डॉ. मॅकमरे ह्यांच्या अनुभवसिद्ध तंत्राला मिळालेली मान्यता सहज पटण्यासारखी आहे. त्यांच्या कंपनीनें तयार केलेल्या योजनावजा तंत्राचे पुढीलप्रमाणें आठ टप्पे आहेत—

| | |
|---|---|
| १. अर्ज मागविणें | ५. टेलिफोनवरून खात्री |
| २. प्राथमिक चाळणी | ६. तपशीलवार मुलाखत |
| ३. अर्जांची छाननी | ७. मूल्यमापन |
| ४. समक्ष चांचणी | ८. अखेरचा निर्णय. |

### अर्जदाराच्या निवडींतील आठ टप्पे

**१. अर्ज मागविणें**—काम जितकें जास्त महत्त्वाचें तितकें निवडीचें क्षेत्र व्यापक ठेवावयाला पाहिजे. जें काम कोणीहि करूं शकेल अशा कामासाठी निवड करतांना दहा अर्जदार पुरे होतील; पण महत्त्वाच्या जागेसाठी २०० अर्जदारांतूनहि लायक मनुष्य मिळेलच असें नाहीं.

**२. प्राथमिक चाळणी**—जे अर्जदार अगदीं उघडच लायक नाहींत (ज्यांचें वय अथवा शिक्षण गरजेनुसार नाहीं किंवा ज्यांची शरीरप्रकृतीच मुळांत कामाचा भार झेंपण्यासारखी नाहीं) अशांना मुलाखतीस बोलावण्याचें कारण नाहीं. त्यामुळें चांगल्या दर्जाच्या उमेदवारांतून निवड करण्यास अधिक वाव मिळतो.

**३. अर्जांची छाननी**—मुलाखतीच्या आधींच अर्जदारांविषयींचा सर्व तपशील दप्तरीं असावयाला पाहिजे. अर्जांचे भरून पाठविण्याचे फॉर्मसच मुळीं त्या दृष्टीनें तयार केलेले असावेत. पूर्वीच्या नोकरीची जागा, त्यांनीं शिक्षण घेतलेलें कॉलेज, इत्यादि ठिकाणांहूनहि अर्जदारांविषयींची माहिती मागवावी.

**४. समक्ष चांचणी**—अर्जदाराची शिकण्याची तत्परता आणि नित्याचे प्रश्न हाताळण्याची कुवत ह्यांची पारख करण्यासाठी चांचणी घेण्याचा हा टप्पा होय. ह्या चांचणीचा निष्कर्ष काढण्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असते. इतर निकषांबरोबर चांचणीचा निष्कर्षहि ताडून पाहिला पाहिजे.

**५. टेलिफोनवरून खात्री**—पूर्वीच्या मालकांशीं पत्रव्यवहार करण्यापेक्षा त्यांच्याशीं टेलिफोनवरून बोलणें अधिक विश्वासार्ह ठरतें. बोलणाराची पद्धति आणि आवाज ह्यांवरून जें कळेल तें पत्रव्यवहारावरून लक्षांतहि येणार नाहीं. "तुम्ही ह्या माणसाला पुन: कामावर घ्याल का?" बोलण्याच्या ओघांतील हा अखेरचा प्रश्न तर फारच उद्बोधक ठरतो.

**६. तपशीलवार मुलाखत**—योजना आंखून तिच्यानुसार मुलाखत घेतली गेली पाहिजे. शिवाय प्रत्यक्ष मुलाखतींत सर्व मुद्यांचा परामर्श घेतला जावा. मुलाखत घेणारानें पूर्वग्रह वर्ज्य करावा; लहानसहान गोष्टींहि बारकाईनें व काळजीपूर्वक पाहाव्यात.

**७. मूल्यमापन**—अर्जदाराचा मूळ दर्जा, त्याला गतिमान करणाऱ्या गोष्टी आणि त्याची मानसिक परिपक्वता ह्यांबद्दल निश्चित मत बनविण्याची हीच वेळ होय. सहसा मूळ दर्जा फारसा सुधारूं शकत नाहीं. मुलाखतींत जे गुणदोष दिसून आले ते पुढेंहि कायम राहण्याचाच अधिक संभव असतो. त्यांत फारसा फरक पडूं शकत नाहीं.

**८. अखेरचा निर्णय**—अर्जदाराला त्याच्या घरीं जाऊन भेटणें, त्याच्या पत्नीची व कुटुंबियांची गाठ घेणें, घरांतील इतरांचीहि चौकशी करणें ह्यामुळें त्याच्या घरची स्थिति, बाकीचे लोक त्याला मदत करतील किंवा नाहीं, इत्यादि गोष्टी समजूं शकतात. अर्जदाराच्या हातून काम किती चांगल्या तऱ्हेनें होऊं शकेल ह्याची कल्पना येण्यास ह्या सर्व गोष्टींची मदत होते.

अर्जदार काय करूं शकेल, प्रत्यक्ष काय करील, कामाशीं कितपत समरस होईल, त्याची प्रगति कशाप्रकारें होऊं शकेल इ. सर्व आवश्यक बाबींची पूर्ण कल्पना वरील आठ टप्प्यांत येईल. कामाला न जुळणारा माणूस नेमला गेल्यामुळें होणारें नुकसान यामुळें टाळतां येतें.

कचेरींतील व कारखान्यांतील जागा भरतांना या तंत्राचा उपयोग केला गेला तर त्यांतल्यात्यांत योग्य मनुष्याची निवड केली जाईल. कोणत्या कामासाठी माणूस नेमावयाचा आहे, त्या कामाचें स्वरूप आणि कोणाच्या हाताखालीं वा समवेत त्याला काम करावें लागेल ह्यांचाहि विचार करणें सयुक्तिक असतें. परिणामत: विसंगतीस वाव उरणार नाहीं, माणसाची लायकी वाया जाणार नाहीं आणि कामाला अनुरूप असाच माणूस नेमला जाईल. कार्यक्षमतेची ही कसोटी लावली म्हणजे वशिलेबाजी आणि तिचे दुष्परिणाम आपोआपच टळतील. वशिल्यामुळें अर्जदार फार तर एक दोन टप्पे जाईल; पण पुढें मात्र लायकीखेरीज त्याला दुसरा आधार उपयोगी पडणार नाहीं.

—'उद्यम,' ऑगस्ट १९५९

दातांच्या स्वच्छतेसाठी
माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

## मुरारजींचा परदेशीं दौरा

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी परदेशांची मदत वेळींच मिळवून ठेवण्यासाठी अर्थमंत्री श्री. मुरारजी देसाई ८ सप्टेंबर रोजीं दिल्लीहून परदेशीं रवाना होतील. प. जर्मनी, स्वित्झरलंड, फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका आणि जपान, हीं घरें पुजण्यासाठी ते झोळी घेऊन जात आहेत. भारताचे कमिशनर जनरल फॉर इकॉनॉमिक अफेअर्स, श्री. बी. के. नेहरू, हे वॉशिंग्टन येथून दिल्लीला आले आहेत, ते श्री. देसाई ह्यांना मदत कोणाकडून, किती व कशी मिळूं शकेल ह्याची कल्पना करून देतील. रशियानें भारताला १८० कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे, त्याचा तपशील ठरविण्यासाठी श्री. बी. के. नेहरू हे मॉस्कोला १७ ऑगस्ट रोजीं जाणार आहेत.

### बँका व नोकर ह्यांना मजूरमंत्र्यांचा सल्ला

बँक अवार्डची मुदत ३१ मार्च, १९५९ रोजीं संपली आणि अवार्ड रद्द व्हावें अशी बँक नोकरांनीं नोटिस दिली. त्यानंतर आतां बँकिंगच्या व्यवसायांतील तंटे कसे सोडविण्यांत यावेत, ह्याविषयीं बँकांचे प्रतिनिधी, नोकरांचे प्रतिनिधी व सरकारचे प्रतिनिधी ह्यांच्यांत दिल्ली येथें मध्यवर्ती मजूरमंत्रि, श्री. नंदा, ह्यांच्या अध्यक्षतेसाली दि. ८ रोजीं चर्चा झाली. बँकांचे प्रतिनिधी व नोकर ह्यांनीं एकमेकांशीं चर्चा करून तंटे मिटवावे, असें श्री. नंदा ह्यांनीं सुचविलें. हें शक्य नसल्यास, मध्यस्थांचा अवलंब करावा; त्यांतहि यश आलें नाहीं तर लवादाकडे निर्णयासाठी प्रकरण सोंपवावें, असेंहि ते म्हणाले. ह्या सूचना नोकरांच्या प्रतिनिधींनीं मान्य केल्या; बँकांनीं मत देण्यास एक पंधरवड्याची मुदत मागून घेतली. बँकांचें प्रतिनिधित्व इंडियन बँक्स असोसिएशन व एक्स्चेंज बँक्स असोसिएशन ह्यांच्या प्रतिनिधींनीं केलें; ऑल-इंडिया बँक एम्प्लॉइज असोसिएशन व ऑल-इंडिया बँक एम्प्लॉइज फेडरेशन ह्यांच्या प्रतिनिधींनीं नोकरांचें प्रतिनिधित्व केलें.

### रिझर्व्ह बँकेचे डे. गव्हर्नर, श्री. रामनाथ ह्यांची निवृत्ति

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर, श्री. रामनाथ, ह्यांना सेवानिवृत्तीच्या वेळीं मानपत्र अर्पण करण्यांत आलें. त्यांत श्री. रामनाथ ह्यांच्या कार्याचा गौरवपर उल्लेख करण्यांत आला. १९५१ पासून ते रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर होते आणि बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या अंमलबजावणीचें काम त्यांच्याकडे होतें. भारतांतील सर्व बँकांची देखरेख व तपासणी, हेंहि त्यांचेंच काम होतें. समारंभाच्या अध्यक्षस्थानीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. एच. व्ही. आर. अयंगार हे होते.

### १९६१ मधील शिरगणतीची चांचणी

१९६१ मध्यें व्हावयाच्या शिरगणतीची चांचणी मुंबई राज्यांत घेण्यासाठी मुंबई, पुणें नागपूर, राजकोट, नांदेड व आनंद हीं शहरें आणि पनवेल, मिरज, जुनागड, अकोला, औरंगाबाद ह्या गांवांजवळील कांहीं खेडीं, ह्यांची निवड करण्यांत आली आहे. चार ठिकाणीं चांचणीच्या शिरगणतीचें काम पुरें झालें, कांहीं ठिकाणीं चालू आहे. १९६१ मधील शिरगणतीसाठी १,००,००० लोकांच्या मदतीची गरज लागेल. प्राथमिक शिक्षक व सरकारी नोकर ह्यांची त्यासाठी योजना केली जाईल.

### मुंबई सरकारच्या नोकरींतील स्त्रिया

मुंबई राज्य सरकारच्या नोकरींत २८० गॅझेटेड व १५,२५० नॉन-गॅझेटेड स्त्रिया आहेत. त्यांचें एकूण सरकारी नोकरांशीं प्रमाण अनुक्रमें ३% आणि ११% पडतें.


माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.


★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—गुणगाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक : -श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.
भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.
शाखा - फोर्ट · दादर · माहिम · वरळी · पुणें · चेळगांव.
महिला शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव-मुंबई ४.

किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळप करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटल-पासून तयार केलेले असून वर्षानुवर्षे कितीहि काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी ( द. सातारा )

## स्टेट बँकेचें प्रस्थ वाढणार

स्टेट बँकेनें स्टेट–असोसिएटेड बँका स्वतःकडे 'सबसिडि-अरीज' म्हणून घेण्याची तरतूद करणारें बिल सध्यां लोकसभेपुढें आहे आणि कालांतरानें तें मंजूर होईलच. रूरल क्रेडिट सर्व्हेकमिटीनें शिफारस केलेली होती, तिचीच आतां अंमलबजावणी होत आहे. हें बिल मंजूर झाल्यावर स्टेट बँक ऑफ इंडियाचें महत्त्व आणखी वाढेल; बँकिंगच्या व्यवसायावरील त्या बँकेची पकड ज्यास्तच होईल. स्टेट-असोसिएटेड बँकांची जिंदगी स्टेट बँकेच्या नियंत्रणाखालीं आली, म्हणजे स्टेट बँकेकडील ठेवी ६५० कोटी रुपयांचेवर जातील. शेड्यूल्ड बँकांच्या एकूण ठेवींच्या एकतृतीयांशाइतकी ही रक्कम होईल. स्टेट बँक स्टेट-असोसिएटेड बँका स्वतःकडे घेऊन त्यांची सबसिडिअरी बँका म्हणून पुनर्घटना करील. ह्या बँकांच्या भागदारांना पुनर्घटित बँकांच्या एकूण भाग भांडवलापैकी ४५% भांडवल विकत घेतां येईल. म्हणजे, त्या बँकांचें संपूर्ण राष्ट्रीयीकरण होणार नाहीं. स्टेट बँकेचें राष्ट्रीयीकरण झालें तेव्हां भागदारांची भरपाई ज्या पद्धतीनें केली ती पद्धत येथें लागू पडणार नाहीं; कारण, कांहीं बँकांची सुरुवात होऊन फार वर्षे लोटलेलीं नाहींत आणि त्यांच्या डिव्हिडंडचा किंवा त्यांच्या भागांच्या बाजारभावाचा विचार करणें इष्ट ठरणार नाहीं. ज्या बँकांच्या भाग भांडवलाची मालकी कुठल्यातरी राज्य सरकारचीच आहे, अशा बँकांच्या भागांची किंमत ठरविणेंहि सोपें होणार नाहीं. म्हणून भागदारांना त्यांच्या भागांच्या खऱ्या किंमती-इतकी भरपाई करावी, असें ठरलें आहे. बँकेच्या देण्यापेक्षा जिंदगी किती ज्यास्त आहे, त्यावर ती किंमत अवलंबून राहील. कांहीं बँकांच्या भागदारांना ही पद्धत फायदेशीरच ठरेल. कारण त्यांच्या भागांच्या बाजारभावापेक्षा त्यांना ज्यास्त भरपाई मिळण्याच्या संभव आहे. भागदारांना अशा रीतीनें तक्रारीस जागा नाहीं. त्याचप्रमाणें, त्यांना त्यांच्या पुनर्घटित बँकेचे नवे भाग विकत घेण्यास सवलत आहेच. नव्या संस्थांच्या एकूण वसूल भांडवलाच्या ४५% पेक्षां ज्यास्त भांडवल खाजगी भागदारांना मिळणार नाहीं, एवढेंच. बँक ऑफ बिकानेर, बँक ऑफ इंदूर, बँक ऑफ जयपूर, बँक ऑफ म्हैसूर व त्रावणकोर बँक ह्यांनीं आपली संमति दिलेली आहे. बँक ऑफ पतियाळा, स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र आणि स्टेट बँक ऑफ हैद्राबाद ह्यांच्या पुनर्घटनेस संबंधित सरकारांची आणि रिझर्व्ह बँकेची संमति आहे. ह्या तीन बँकांचे संबंधीं भरपाईची रक्कम स्टेट बँक रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानें निश्चित करील. ह्या आठ बँकांत काम करणाऱ्या नोकरांना स्टेट बँकेच्या नोकरांइतकेच पगार व सवलती असाव्यात, असें जॉइंट सिलेक्ट कमिटीच्या अल्पसंख्य सभासदांनीं सुचविलें आहे; कमिटीमधील बहुमत तसें नाहीं.

## ब्रह्मदेशांतील रस्तेबांधणीसाठी अमेरिकेची मदत

ब्रह्मदेशाच्या सरकारनें अमेरिकेची आर्थिक मदत घेऊन रंगून ते मंडाले हा राजरस्ता पुन्हा बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या व इतर कांहीं मोठ्या कामासाठी अमेरिकेचें सरकार ब्रह्मदेशाला ३·७ कोटी डॉलर्स मदतीदाखल देणार आहे. इतर बाबींत रंगूनच्या विद्यापीठाला देण्यांत येणाऱ्या मदतीचा समावेश आहे. ह्या सर्व कामासाठी मिळून सुमारें ६ ते ७॥ कोटी डॉलर्स खर्च लागेल असा अंदाज आहे. जादा लागणाऱ्या रकमेपैकी सुमारें १·५ कोटी डॉलर्सची रक्कम अमेरिकेनें ब्रह्मदेशाला दिलेल्या शेतीच्या मालाच्या विक्रींतुन उभारण्यांत येणार आहे. १९५३ सालीं ब्रह्मदेशास अमेरिकेनें देऊ केलेली २ कोटी डॉलर्सची मदत नाकारली होती. त्याचें कारण राजकीय स्वरूपाचें होतें. दुसरें महायुद्ध संपल्यावर सुमारें १०,००० चिनी लष्कर ब्रह्मदेशाच्या ईशान्य कोपऱ्यांत आलेलें होतें व त्यानें त्या भागांत धुडगूस मांडला होता. पुढें १९४९ सालीं चीनची मुख्य भूमि चिनी कम्युनिस्टांच्या ताब्यांत गेली व अमेरिकेनें फॉर्मोसांत पळून गेलेल्या चँग-कै-शेक ह्यांच्या सरकारला पाठिंबा दिला. ब्रह्मदेशांत आलेले चिनी सैन्य फॉर्मोसा सरकारचें होतें. तें काढून घेण्याच्या कामांत साह्य देण्यांत अमेरिकेनें पुरेसें सहकार्य दिलें नाहीं, अशी ब्रह्मदेशाच्या सरकारची तक्रार होती. आतां ह्या बंडखोर लष्कराचा निःपात झालेला आहे. व अमेरिकेची मदत घेण्याचा मार्ग खुला झाला आहे. १९५३ नंतर ब्रह्मदेशानें अमेरिकेची मदत ही पहिल्यानेंच स्वीकारलेली आहे. आतांपर्यंत ब्रह्मदेशानें अमेरिकेकडून सुमारें १५·५ कोटी डॉलर्सची मदत घेतलेली आहे. रंगून ते मंडाले हा रस्ता नव्यानें बांधण्यासाठी प्रथम पहाणी करावी लागेल. अमेरिकन लष्करांतील मुलकी अधिकारी ह्या कामासाठी ब्रह्मदेशांत येऊन दाखल झाले आहेत.

## लहान उद्योगधंद्यांना कर्जपुरवठा

"राष्ट्राच्या सध्यांच्या अर्थव्यवस्थेंत छोट्या उद्योगधंद्यांना महत्त्वाचें स्थान आहे. देशांत रोजगारीचें विकेंद्रीकरण करण्यास भरपूर वाव आहे. अर्थव्यवस्थेच्या समतोल विकासासाठी उद्योगांचें विकेंद्रीकरण करावें हें सर्वांनाच मान्य आहे. औद्योगिक वसाहती स्थापण्याच्या सरकारी धोरणास फारसें यश आलेलें नाहीं असें दिसतें. तेव्हां या वसाहतीकडे उद्योगधंदे कां आकृष्ट होत नाहींत किंवा त्यांच्या मार्गांत काय अडचणी आहेत याचा विचार करणें आवश्यक आहे. माझा विश्वास आहे कीं, सरकारनें वीज, पाणी, दळणवळण, बँका इ. सोयी उपलब्ध केल्यास औद्योगिक केंद्राच्या ठिकाणीं उद्योग सुरू करणें चालकांना नेहमीच फायदेशीर वाटेल.

"लहान उद्योगधंद्यांना बँकांच्या आर्थिक साहाय्याच्याहि कांहीं अडचणी आहेत. अगदीं सुरुवातीच्या काळांत लहान उद्योगधंदेवाले बँकांकडून कर्ज आणि अन्य आर्थिक मदत घेतात. परंतु थोडीशी प्रगति केल्यावर विकासासाठी म्हणून ते स्टेट फिनान्स कॉर्पोरेशन अगर तत्सम मोठ्या संस्थांकडे जातात. अशा संस्था आर्थिक साहाय्य देतांना यापुढें आपले आर्थिक व्यवहार मान्यता दिलेल्या बँकांमार्फतच करावेत अशी अट घालतात व त्यामुळें उद्योगचालकांना पूर्वीच्या बँकांशीं असलेले आपले संबंध तोडून टाकावे लागतात. रिझर्व्ह बँकेनें घालून दिलेल्या मर्यादेंतच बँका आपले व्यवहार करीत असतांनासुद्धां त्यांना असें पक्षपातीपणानें कां वागविलें जातें, हेंच कळत नाहीं.

"लहान धंद्यांच्याविषयीं सर्वांगीण चर्चा झाली, त्यावेळींहि त्यांना आर्थिक साहाय्य वेगवेगळ्या संस्थांनीं द्यावें अशी शिफारस करण्यांत आली. तेव्हां लहान उद्योगधंद्यांना कर्जें देण्याच्या अटी थोड्याशा शिथिल करणें योग्य ठरेल असें मला वाटतें. त्यायोगें केवळ उद्योगधंद्यांचाच विकास न होतां बँकांच्या निकोप वाढीसहि मदतच होईल."—महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या त्रैमासिक सभेंत श्री. कृ. ह. ढमढेरे ह्यांचें अध्यक्षीय भाषण.

## अमेरिकेच्या बैलांचें खाटमांडु विमानतळावर स्वागत

नेपाळमधील जनावरांच्या अवलादीच्या सुधारणेसाठी अमेरिकेनें दोन बैल आणि सहा मेंढ्या ह्यांची देणगी दिली आहे. हीं जनावरें खाटमांडूला दि. २ रोजीं विमानानें दाखल झालीं. नेपाळ सरकारच्या अन्न-शेतकीखात्याचे सेक्रेटरी आणि शेतकी खात्याचे डायरेक्टर विमानतळावर स्वागतासाठी उपस्थित होते. वहातुकी-साठी १२,००० रु. खर्च आला.

## टपाल व तार खात्याचा वार्षिक अहवाल

भारतांतील टपाल कचेर्‍यांची संख्या ३१ मार्च १९५७ मधील ५८,८७१ वरून ३१ मार्च १९५८ रोजीं ६१,८८६ वर गेली आहे. त्याचप्रमाणें, तार कचेर्‍यांची संख्याहि या काळांत १०,०५१२ वरून १०,७२३ वर, टेलिफोन एक्सचेंजिसची संख्या ६,२०२ वरून ६,४७२ वर व टेलिफोनची संख्या ३,०९,००० वरून ३,३५,००० वर गेली असल्याचें टपाल व तार खात्याच्या १९५७–५८ च्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें.

टपालानें पाठविण्यांत आलेल्या वस्तूंची संख्या १९५६–५७ मधील ३२६९ दशलक्षांवरून या वर्षांत ३३५६ दशलक्षांवर गेली, तर टेलिफोन ट्रंककॉल्सची संख्या याच काळांत २०·८ दशलक्षांवरून २३·१ दशलक्षावर गेली. या वर्षांत पाठविण्यांत आलेल्या तारांच्या संख्येंत ( या खात्याच्या तारा वगळून ) मात्र या वर्षांत १९५६–५७ मधील ३४·५ दशलक्षांवरून ३२·२ दशलक्षांपर्यंत घट झाली आहे.

### उत्पन्न

पुनर्विलोकनाच्या या वर्षांत सदर खात्याचें उत्पन्न १९५६-५७ मधील ५६·८ कोटी रु. वरून ६१·६ कोटी रु. वर गेलें. खर्चाचा आंकडाहि मागील वर्षांतील सुमारें ५०·५२ कोटी रु. वरून या वर्षांत ७·४० कोटी रु. नीं वाढला आहे. सदर खात्याकडे या वर्षाअखेर ३·७१ कोटी रु. शिल्लक राहिली. १९५६–५७ व १९५५–५६ चे हेच आंकडे अनुक्रमें ६·३२ कोटी रु. व ३·४७ कोटी रु. असे होते.

या निव्वळ शिल्लकीपैकी ५० टक्के, म्हणजे १·८५ कोटी रु. सर्वसाधारण महसुलांत देण्यांत आले तर उरलेली रक्कम या खात्याच्या शिल्लकींत घातल्यानें ३१ मार्च १९५९ रोजीं हा आंकडा २३९१·८२ लाख रु. वर गेला आहे.

### टपाल खात्याविरुद्ध तक्रारी

टपालानें पाठविण्यांत आलेल्या वस्तूंबाबत, पुनर्विलोकनाच्या या वर्षांत जनतेकडून ४,९१,४७० तक्रारी आल्या. गतवर्षींचा हाच आंकडा ४,६८,१८४ होता.

### छोट्या बचती

पुर्विलोकनाच्या या वर्षांत पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत १३,१५,०३४ नवीं खातीं उघडण्यांत आलीं तर ७,७९,६५८ खातीं बंद करण्यांत आलीं. या वर्षअखेर ६९,२०,२३५ खातीं चालू होतीं. गतवर्षींचा हाच आंकडा ६३,८४,९५९ असा होता. बँकेंतील शिलकीचा आंकडा १९५६–५७ असेरच्या ३२२ कोटी रु. वरून १९५७–५८ अखेर ३४० कोटी रु. वर गेला. प्रत्येक खातेदाराच्या नांवावरील रकमेचा सरासरी आंकडा मागील वर्षाच्या ५०४·४ रु. वरून या वर्षअखेर ४९०·८ वर आला.

अहवालाच्या या वर्षांत टपाल खात्यानें एकूण १,९६,२६,१०० रु. मूल्यांची ८,०९४ लाईफ ॲण्ड एन्डोमेंट विमापत्रें दिली. गतवर्षी २,२०,७३,७०० रु. चीं १०,८६१ विमापत्रें देण्यांत आलीं होतीं. ३१ मार्च १९५८ रोजीं एकूण ३४,२२,१७,८८५ रु. चीं १,४५,५३४ विमापत्रें चालू होतीं.

**पोलिसांची राहण्याची सोय**—मध्यवर्ती सरकारनें गेल्या तीन वर्षांत पोलिस दलांतील लोकांची राहण्याची सोय करण्यासाठी ६१ कोटी रुपयांची रक्कम राज्य सरकारांना कर्जाऊ म्हणून दिली आहे. १९५९–६० सालांत ३ कोटी रुपये ह्या कामासाठी देण्यांत येतील. राज्य सरकारांनीं ही कर्जे पांच वर्षांनंतर २० सारख्या हप्त्यांनीं फेडावयाचीं आहेत.

## अल्पबचत योजनेंत मुंबईचा पुढाकार

जून, १९५९ असेरच्या तिमाहींत अल्पबचत योजनेच्या द्वारां एकूण जेवढी रक्कम गुंतविली गेली, तिच्या ६२% रक्कम एकट्या मुंबई राज्यांतून जमा झाली. सबंध भारतांत मिळून ७,७८,७७,००० रु. मिळाले. त्यांपैकीं ४,८३,३०,००० रु. मुंबई राज्यानें दिले. गेल्या वर्षीच्या तत्सम तिमाहींत मुंबई राज्यानें ३,१७,३७,००० रु. जमविले होते.

१९५८–५९ मध्यें सबंध भारतांत अल्पबचत योजना ७८ कोटी रु. देईल, असा अंदाज आहे; १९५७–५८ मधील वसुली ६९ कोटी रुपये होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत अल्पबचत योजनेच्या द्वारां सरकारला २०६ कोटी रु. मिळाले. म्हणजे, वार्षिक सरासरी ६९ कोटी रु. पडली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दरसाल १०० कोटी रु. मिळावे, असें लक्ष ठेवण्यांत आलेलें आहे. अल्पबचत योजना लोकप्रिय करण्यासाठी १९५८–५९ मध्यें आणखी कांहीं सुधारणा करण्यांत आल्या. चेकनें रकमा काढण्याची सोय प्रथम मुंबईत सुरू करण्यांत आली; ती आतां आणखी कांहीं निवडक पोस्टांतून चालू करण्यांत आली आहे. आठवड्यांतून दोनदां पैसे काढण्याची सवलत सगळ्या पोस्टांत सुरू केलेली आहे. चेकनें ठेवी स्वीकारण्यासहि प्रारंभ झाला आहे. नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांतील गुंतवणुकीची कमाल मर्यादा वाढविण्यांत आली आहे. क्युम्युलेटिव्ह टाइम डिपॉझिट योजना २ जानेवारी, १९५९ पासून अंमलांत आली आहे.

अल्पबचतीच्या योजनेनें जमलेल्या एकूण रकमेपैकी ४८ कोटी रुपये राज्यसरकारांना १९५८–५९ मध्यें देण्यांत आले. १९५७–५८ मध्यें ४० कोटी रुपये देण्यांत आले होते; १९५७–५८ मध्यें प्रत्येक राज्यांतील अल्पबचतीची जमा रक्कम त्या त्या राज्यानें उभारलेल्या कर्जाच्या रकमेंत मिळवून त्यांतून मध्यवर्ती सरकारनें व राज्य सरकारनें १ : २ ह्या प्रमाणांत रकमा वाटून घेतल्या. राज्य सरकारांना प्रलोभन म्हणून, हें प्रमाण त्यांना आतां अधिक फायदेशीर करण्यांत आलें आहे. त्यांनीं उभारलेलें सर्व कर्ज त्यांना मिळावें आणि त्यांनीं जमविलेल्या अल्पबचतीपैकी दोन तृतीयांश रक्कम त्यांनीं घ्यावी, अशी नवी योजना आहे.

## आंध्र राज्यांतील कंपन्यांच्या देणग्या

ज्या कंपन्यांत आंध्र राज्य सरकारचे शेअर्स आहेत, अशा कंपन्यांनीं गेल्या तीन वर्षांत एकूण २,९३,३२६ रुपयांच्या देणग्या राजकीय पक्षांना व व्यक्तींना दिल्या, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री श्री. संजीव रेड्डी ह्यांनीं दिली आहे. स्थानिक प्रदेश कॉंग्रेस कमिटीला १,१४,५०० रुपयांची देणगी मिळाली. कॉंग्रेसच्या जवाहरलाल नेहरू व मुरारजी देसाई फंडांना ३९,००० रु. मिळाले. पश्चिम बंगाल कॉंग्रेस कमिटीला १,८०० रु. व सोशलिस्ट पक्षाला ५०० रु. मिळाले. १९५७ मध्यें "राष्ट्रीय हितासाठी" दिलेल्या २२,८१८ रुपयांच्या देणगीपैकी १५,००० रु. 'आंध्रजनता' ह्या तेलुगु दैनिकास मिळाले. मॅनेजिंग एजंटांच्या प्रतिनिधींनीं एक लक्ष रुपयांची रक्कम स्वतःच्या नांवें चेक काढून 'एका राजकीय पक्षाला देणगी देण्यासाठीं' त्याचा विनियोग केला, परंतु ती रक्कम सस्पेन्स खातीं ठेवण्यांत आली आहे. योग्य व्हाउचर्स आल्यावर हिशेबांत दुरुस्ती केली जाईल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.